MHGO070000592026

<u>निशाणी १ खालील आदेश</u>
**(**घोषीत दिनांक १७ मार्च**,** २०२६**)**

अर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. थोडक्यात अर्जदाराचा तपशील असा आहे की, मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे हे अर्जदार क्रमांक १ उज्वला देवानंद टेंभूर्णे यांचे पती, अर्जदार क्रमांक २ सुप्रिया देवानंद टेंभूर्णे आणि अर्जदार क्रमांक ३ साहील देवानंद टेंभूर्णे यांचे वडील आहेत. मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे यांचे दिनांक ०३/१२/२०२५ रोजी निधन झाले. मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे यांचे वडील पंढरी पैकू टेंभूर्णे यांचे दिनांक २१/०७/२०२२ रोजी व त्यांची आई सारूबाई पंढरी टेंभूर्णे यांचे दिनांक २४/०५/२०१० रोजी निधन झाले. त्यामुळे अर्जदारांच्याव्यतिरिक्त मयताचे इतर कोणीही वारस नाही.

२**)** अर्जदार क्रमांक १ उज्वला यांनी त्यांचे साक्षी पुराव्याचे शपथपत्र नि.क्रं.१४ प्रमाणे अभिलेखावर दाखल केले आहे. त्यांचे पती मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे, मयत सारूबाई पंढरी टेंभूर्णे, मयत पंढरी पैकू टेंभूर्णे यांची मृत्यु प्रमाणपत्रे, अर्जदारांच्या आधार कार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती आणि पोलीस पाटील, देवरी यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र अनुक्रमे नि.क्रं.१५ ते २१ वर दाखल केलेल्या आहेत.

३**)** दैनिक कशीशमध्ये दिनांक ३१/०१/२०२६ रोजी प्रसिध्द केलेली जाहीरनामा पावती नि.क्र. २१ व प्रसिध्द केलेला जाहिरनामा निशाणी क्रमांक २२ वर आहेत तसेच मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे यांचे वारस असल्याबद्दल सायटेशन नोटीस नि.क्र. १० ते १३ प्रमाणे काढण्यात आले परंतू आजपर्यंत त्यावर कुणीही आक्षेप नोंदविलेला नाही तसेच अर्जदाराने पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्रं.२४ वर अभिलेखावर दाखल केली आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

४**)** आजपर्यंत कुणीही अर्जदारांव्यतिरिक्त वारस असल्याबाबत आक्षेप न घेतल्याने व अर्जदार क्रमांक १ यांनी त्यांच्या दावा शपथेवर साक्ष नोंदवून सिध्द केल्यावरून, मी अर्जदारांना मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे यांचे कायदेशीर वारस आहेत, असे मान्य करतो व खालील प्रमाणे आदेश पारीत करतो:-

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र. १) मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्रमांक १ उज्वला देवानंद टेंभूर्णे, अर्जदार क्रमांक २ सुप्रिया देवानंद टेंभूर्णे आणि अर्जदार क्रमांक ३ साहील देवानंद टेंभूर्णे यांना मयत देवानंद पंढरी टेंभूर्णे यांचे वारस घोषीत करण्यात येते.

३. सदरहू अर्जदारांनी त्यांच्या नावे आवश्यक ती कोर्ट फी भरल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. अर्ज निकाली काढण्यात येतो.

VINAY SAHADEO MENDHE

Digitally signed by VINAY SAHADEO MENDHE
Date: 2026.03.30 17:44:12 +0530

(श्री. व्ही. एस. मेंढे )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
देवरी

दिनांक :१७.०३.२०२६

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | संजीवन वामन मळामे |
| न्यायालयाचे नाव | : | श्री. व्ही. एस. मेंढे, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग देवरी. |
| आदेशाची तारीख | : | १७/०३/२०२६ |
| आदेशावर अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १७/०३/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १७/०३/२०२६ |